जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट दिनांक - ०१/०५/२०२४**

# ०१ मे २०२४ महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६४ वा वर्धापन दिन

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६४ व्या वर्धापन दिनोत्सवानिमित्त सोमवार दि.१ मे २०२४ रोजी सकाळी ०८/०० वा.**मा.ना.श्री.अजितदादा पवार उपमुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री,पुणे जिल्हा** यांचे शुभहस्ते पोलीस संचलन मैदान शिवाजीनगर,पुणे येथे **ध्वजारोहण समारंभाचा** कार्यक्रम संपन्न झाला. राष्ट्रध्वज वंदन व संचलन समारंभास मा.अपर पोलीस महासंचालक (कारगृह व सुधार सेवा)महाराष्ट्र राज्य, श्री.अमिताभ गुप्ता,मा.अपर पोलीस महासंचालक(आस्थापना)पोलीस महासंचालक कार्यालय मुंबई,श्री.संजीव कुमार सिंघल,मा.अपर पोलीस महासंचालक दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभाग श्री.सुनिल रामानंद मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर, श्री.अमितेश कुमार, मा.पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड श्री.विनयकुमार चौबे, मा.सह.पोलीस आयुक्त,पुणे श्री.प्रविण पवार मा.अपर पोलीस आयुक्त,(प्रशासन),श्री.अरविंद चावरिया ,मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे श्री.मनोज पाटील मा.अपर पोलीस आयुक्त,(गुन्हे)श्री.शैलैश बलकवडे,मा.अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस अधिक्षक (पुणे ग्रामीण) श्री.पंकज देशमुख इतर विभागाचे वरिष्ठ पोलीस अधिकारी व पोलीस आयुक्तालयातील सर्व परिमंडळीय पोलीस उप-आयुक्त,विभागीय सहा.पोलीस आयुक्त दर्जाचे अधिकारी उपस्थित होते. सदर वेळी पुणे शहर व परिसरातील इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच सेवानिवृत्त पोलीस अधिकारी,सर्व शासकीय, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी हजर होते.

सकाळी ०८/०० वा.मंत्री महोदय यांचे आगमन व स्वागत झाले. प्रमुख पाहुणे म्हणुन **मा.डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार(भा.प्र.से), विभागीय आयुक्त,पुणे विभाग,पुणे तसेच मा.डॉ.सुहास दिवसे(भा.प्र.से),जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,पुणे यांचे उपस्थितीत ध्वजारोहण करून,मा.पालकमंत्री महोदयाकडुन पोलीस दल,गृहरक्षक दल येरवडा कारागृह पोलीस, अग्निशामक दल,होमगार्ड या संचलन पथकाची पाहणी केली.**

संचलन परेड कमांडर श्री.दशरथ हाटकर राखीव पोलीस निरीक्षक शिवाजीनगर मुख्यालय,पुणे तसेच सेकंड इन कमांडर प्रमुख श्री.संजय साबळे राखीव पोलीस उप निरीक्षक शिवाजीनगर मुख्यालय यांनी केले. तसेच पथसंचलना मध्ये एकुण १२ प्लाटुन होते. त्यामध्ये पुणे शहरकडील ०४, पुणे ग्रामीणकडील ०१,पुणे लोहमार्ग ०१ पिंपरी-चिंचवड ०१, एसआरपीएफ ग्रुप नं.१ व २ यांचे कडील ०२, पुणे येरवडा कारागृहाकडील ०१ होमगार्ड यांचे कडील ०१, अग्निशामक दल फायरमन यांचेकडील ०१ तसेच श्वान पथकाकडील ऑस्कर श्वान हा परेड मध्ये सहभागी झाला होता, ११२ नंबर वाहन,जलद प्रतिसाद पथक,वरूण वाहन,अग्निशामक दल,शासकीय रूग्ण वाहिका अशी वाहने सहभागी झाली होती,त्याचप्रमाणे पुणे शहर, व पुणे ग्रामीण कडील वाद्यवृंद हा सहभागी झाला होता, परेड करीता २५ अधिकारी व ४१० जवानांनी भाग घेतला. संपुर्ण कार्यक्रमाचे सुत्र संचालन महिला पोलीस उप निरीक्षक सुप्रिया पंधरकर व सेवानिवृत्त सहा.पोलीस फौज. एस.बी.नरके,(एसआरपीएफ),बल गट क्र.२,पुणे यांनी केले

मा.मंत्री महोदय यांनी उपस्थित पदाधिकारी व अधिकारी तसेच सन्माननीय नागरीकांना औपचारीक अभिवादन करून ०१ मे महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या.सदर वेळी मतदान करण्याची शपथ घेण्यात आली

सन २०२३ करीता मा.पोलीस महासंचालक यांचे प्रशंसनीय सेवेसाठी पोलीस महासंचालक पदक मिळालेल्या पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील एकुण १३ पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे मा.पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.